# प्रकरण -1

## भारतातील युरोपियनांचे आगमन

**प्लासीची लढाई :**

इ.स.1700 साली मोगल सम्राट औरंगजेबने मुर्शिद कुली खानाची बंगालच्या सुभ्यावर नेमणूक केली. 1704 साली मुर्शिद कुली खानाने राजधानी मकसूदाबाद येथे आणली व त्यालाच पुढे मुर्शिदाबाद असे नाव दिले. मोगल सत्ताधीश सम्राट औरंगजेबचा मृत्यू 3 मार्च, 1707 रोजी झाला. मोगल साम्राज्याच्या विघटनाला सुरुवात झाली. त्यातून स्थानिक व प्रादेशिक स्वायत्त सत्ताधीशांची महत्त्वाकांक्षा वाढीस लागली व बंगाल, हैदराबाद, अवध व मराठ्यांचे राज्य स्वतंत्र झाले. मोघल बादशहा फर्रुखसियरने 1717 साली दिवाणी व निजामी असे दोन्ही हक्क मुर्शिद कुली खान याच्याकडे दिले.

सन 1727 मध्ये मुर्शिद कुली खानाचा मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी बंगालची सुभेदारी त्याने आपला नातू (मुलीचा मुलगा) सराफराजखान यांच्याकडे सोपवली. परंतु मुर्शिद खानाच्या जावयाने म्हणजेच सरफराजखानाच्या वडीलाने म्हणजेच शुजाउद्दीन महम्मदखानाने मुलाला बाजूला करून स्वतः सत्ता काबीज केली. 1739-40 मध्ये सरफराज पुन्हा बंगालच्या सत्तेवर आला. परंतु यावेळेस सेनापती अलीवर्दी खान व जमीनदार/ सावकार जगतसेठ यांनी त्याला बाजूला केले. 1740 मध्ये अलीवर्दी खान हा बंगालचा नवाब बनला. सन 1740 मध्ये दिल्लीचा बादशहा मोहम्मदशहा याच्या कालखंडात अलीवर्दी खानाने बंगालच्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. अलीवर्दी खान हा एक मुत्सद्दी, कूटनीतीज्ञ व धोरणी शासक होता. त्याने युरोपियन कंपन्यांना बंगाल प्रांतात त्याच्या कालखंडात शिरकाव व संघर्षही करू दिला नाही.

9 एप्रिल, 1756 रोजी अलीवर्दीखानाचा मृत्यू झाला. त्यानंतर अल्पावधीतच बंगालच्या सुभ्यामध्ये राजकीय अराजकता निर्माण झाली. या सर्वांचा परिणाम असा झाला की ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा बंगाल प्रांतामध्ये प्रभाव निर्माण झाला. अलीवर्दी खानाच्या मृत्यूनंतर बंगालच्या नबाबपदी त्याच्या मुलीचा मुलगा म्हणजेच नातू सिराज उद्दौला हा बंगालचा शासक बनला.

**नवाब सिराजउद्दौला :**

नवाब सिराजउद्दौला हा अलीवर्दीखानाची मुलगी अमिना बेगम व जावई झियाउद्दीन यांचा मुलगा होता. सिराजउद्दौला चा जन्म 1733 साली झाला. 1748 साली अलीवर्दीखानाने सिराजउद्दौला आपला नायब सुभेदार म्हणून बिहारला पाठवले. 9 एप्रिल 1756 रोजी अलीवर्दीखान हा मरण पावला. यानंतर 15 एप्रिल, 1756 रोजी सिराजउद्दौला हा बंगालचा नबाब बनला. आजोबा अलीवर्दी खान प्रमाणे सिराजउद्दौला हा मुत्सद्दी नव्हता.

**प्लासीची लढाई :**

त्याच्या दुर्बलपणाचा फायदा ब्रिटिशांनी घेण्याचे ठरवले त्यामुळे ब्रिटिश व सिराजुद्दौला यांच्यात युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली.

**प्लासीच्या लढाईची कारणे :**

1. **कंपनीचा नवाबाशी दुर्व्यवहार :**

ब्रिटिश कंपनीने नवाब सिराजउद्दौला बद्दल सन्मान प्रदर्शित केला नाही. नवाबाच्या राज्याभिषेकाच्या प्रसंगी कोणतीही भेट व नजराणे कंपनीने नवाबाला दिले नाही जी त्यावेळची राजकीय शिष्टाई होती. ब्रिटिशांनी देखील त्यांच्या व्यापारी परिस्थितीची माहिती सिराज उद्दौलाला दिली नाही. प्लासीच्या लढाईला हे एक महत्त्वाचे कारण होते.

**2. नवाबाच्या प्रतिस्पर्ध्यांना इंग्रजांची मदत :**

Dr. S. R. Kattimani History of Modern India

सिराजउद्दौलास नवाबपद मिळाले असले तरी त्याला बरेच प्रतिस्पर्धी होते. त्याचा सर्वात मोठा प्रतिस्पर्धी म्हणजे सेनापती मिरजाफर हा होय. बंगालचा नवाब बनण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. पुर्नियाचा सुभेदार शौकतजंग हा सिराज उद्दौलाचा नातलग व आणखी एक प्रतिस्पर्धी होता. ज्याला इंग्रजांची सहानुभूती होती. ऑक्टोबर 1756 मध्ये नवाब सिराज उद्दौलाने एका लढाईत याचा पराभव करून ठार मारले. नवाबाच्या प्रतिस्पर्ध्यांना ब्रिटिशांनी मदत केल्यामुळे कंपनीला दुर्बल करण्याचा प्रयत्न नवाबाने सुरू केला. यामुळे नवाब सिराजउद्दौला व ईस्ट इंडिया कंपनी मध्ये संघर्ष सुरू झाला.

**3. इंग्रजांकडून दस्तक परवान्याचा दुरुपयोग :**

फर्रूखसीयर या मोगल बादशहाने सन 1717 मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला भारतामध्ये मुक्त व्यापार करण्याचा परवाना दिला होता. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी व अधिकारी या दस्तक परवान्याचा गैरवापर करत. भारतीय व्यापारी ही या दस्तक परवान्याचा वापर ब्रिटिश अधिकाऱ्यांना लाच देण्यासाठी करत असत. याचा परिणाम नवाबाचे आर्थिक उत्पन्न घटले, यामुळेदेखील नवाब व कंपनीमध्ये संघर्ष निर्माण झाला.

**4. नवाबाच्या शत्रूंना आश्रय :**

ब्रिटिशांनी नवाब सिराजउद्दौलाच्या विरोधकाना आश्रय व अभय दिला होता. त्यापैकी एक म्हणजे प्रसिद्ध व्यापारी कृष्णवल्लभ हा होय. कृष्णवल्लभ हा घसिटी बेगम यांचा दिवाण राजवल्लभ यांचा पुत्र होता. अनेक खोटे हिशोब दाखवल्याचा व राज्याचा महसूल उत्पन्न बुडवल्याचा त्याच्यावर आरोप होता. राजवल्लभनेच घसिटी बेगम यांचे धन लपवण्याचा प्रयत्न केला होता. ज्यामुळे नवाबाने त्याला पदावरून पदच्युत केले.

परंतु तत्पूर्वीच राजवल्लभने आपली सर्व संपत्ती पुत्र कृष्णवल्लभला देऊन त्याला इंग्रजांच्या संरक्षणामध्ये पाठवून दिले. नवाबाने कृष्णवल्लभ यांच्याकडे पैशाची मागणी केली. कृष्णवल्लभने पैसे देण्यास स्पष्ट नकार दिला व नवाबाचा प्रतिनिधी नारायण सिंह यांचा अपमानही केला. नवाबाने इंग्रजांना कृष्णवल्लभला ताब्यात देण्याचा हुकूम दिला. परंतु ब्रिटिशांनी कृष्णवल्लभला नवाबाकडे सुपूर्द करण्यास नकार दिला. अशाच प्रकारे नवाझिशखान या भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला इंग्रजांनी आश्रय दिला होता. यामुळे नवाब व ब्रिटिश कंपनी यामध्ये संघर्ष वाढीस लागला.

**5. वखारीच्या तटबंदीचा प्रश्न :**

इंग्रज-फ्रेंच संघर्ष व नागपूरकर भोसले यांची सततची आक्रमणे यामुळे ब्रिटिशांनी स्वसंरक्षणासाठी नवाबाच्या मर्जीची पर्वा न करता बंगालमधील कलकत्ता व हुगळी येथे वखारीस तटबंदी बांधली. सिराजउद्दौला नवाब बनल्यानंतर इंग्रजांनी आपल्या वखारी भोवती तटबंदी उभारण्यास सुरुवात केली. नवाबाला ही गोष्ट आवडली नाही. त्याने तटबंदी पाडण्याचा हुकूम दिला, परंतु इंग्रजांनी नवाबाच्या हुकुमाला न जुमानता आपली कारवाही सुरूच ठेवली त्यामुळे या दोघातील तणाव वाढला.

**अंधारकोठडीची घटना :**

सिराज उद्दौला व इंग्रज यांच्यामधील संबंधांमध्ये उपरोक्त कारणांमुळे बिघाड झालेला असतानाच अंधारकोठडीच्या दुर्घटनेची भर पडली. फ्रेंचांच्या संभाव्य आक्रमणाची आशंका झाल्याने ब्रिटिशांनी कलकत्त्याच्या किल्ल्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले व किल्ल्याभोवती खंदक खोदण्यास सुरुवात केली. नवाबाला ही गोष्ट खटकली व त्याने ब्रिटिशांना हे काम थांबवण्यास सांगितले. नवाबाचे आश्रय असल्यास ब्रिटिशांना काही होणार नाही असे आश्वासन ही देऊ केले.परंतु ब्रिटिशांनी हे काम थांबवले नाही त्यामुळे बंगालचा नवाब सिराजउद्दौलाने इंग्रजांना धडा शिकवण्यासाठी जूनच्या प्रारंभी इंग्रजांच्या कासिम बाजार येथील वखार जिंकून कलकत्त्यावर आक्रमण केले. इंग्रज गव्हर्नर ड्रेक आणि अधिकांश इंग्रजांनी पलायन केले. हॉलवेल याने किल्ल्याच्या सुरक्षेची तयारी केली. परंतु 20 जून, 1756 रोजी नवाबाने किल्ला जिंकून घेतला. व कलकत्त्याचे नाव बदलून अलीनगर असे केले. या किल्ल्यातच अंधार कोठडीची दुर्घटना घडली.

Dr. S. N. Kattimani History of Modern India

**अंधार कोठडीची दुर्घटना (Black Hole Tragedy)**

20 जून,1756 रोजी फोर्ट विल्यम वरील विजयानंतर 146 इंग्रजाना सिराज उद्दौलाने बंदी फोर्ट विल्यमच्या एका 18 फूट लांब व 14.1. फूट रुंद अशा खोलीमध्ये कोंडून ठेवले. ज्यामध्ये एका स्त्रीचा ही समावेश होता. 21 जून रोजी सकाळी फक्त तेवीस लोक यामध्ये जिवंत होते. यापैकी हॉलवेल नावाचा इंग्रज बचावला होता, ज्याने हा इतिहास पुढे कथन केला. 123 इंग्रजांचा गुदमरून यामध्ये मृत्यू झाला. या घटनेला इतिहासामध्ये अंधार कोठडीची दुर्घटना असे संबोधले जाते. या घटनेबाबत सिराजउद्दौला याला जबाबदार धरण्यात आले.

इतिहासकारांमध्ये या घटनेबाबत मतभेद आहेत कारण तत्कालीन भारतीय साहित्य व पत्रव्यवहारात कोठेही या घटनेबद्दल उल्लेख मिळत नाही. ही घटना अतिशयोक्तीपूर्व व हॉलवेलच्या कल्पनेवर आधारित वाटते. कारण 254 स्क्वेअर फूट इतक्या लहान आकाराच्या खोलीमध्ये 146 लोकांना बंद करणे शक्य नाही.

**प्लासीची लढाई:**

अंधार कोठडीच्या दुर्घटनेची बातमी मद्रासच्या इंग्रज अधिकाऱ्यांना समजल्यानंतर त्यांनी नवाब सिराजउद्दौलावर कारवाई करण्याचे निश्चित केले. त्यानुसार ब्रिटिशांनी रॉबर्ट क्लाइव्ह व वॅटसन यांना फौजेनिशी कलकत्त्याला पाठवले.

**अलीनगरचा तह :**

डिसेंबर 1756 माणिकचंद या नवाबाच्या अधिकाऱ्याने लाच घेऊन कलकत्त्याचा ताबा रॉबर्ट क्लाइव्हला दिला. याच कालखंडामध्ये अफगाणिस्तानमधील अहमदशहा अब्दालीचे भारतावर आक्रमण होत होती. बंगाल वरील संभाव्य आक्रमणाच्या भीतीने नवाबाने इंग्रजांशी अलीनगरचा तह फेब्रुवारी 1757 मध्ये केला. यानुसार ब्रिटिशांना जुन्या व्यापारी सवलती नवाबाकडून पुन्हा मिळाल्या. इंग्रजांचे झालेले व्यापारी नुकसान भरून देण्याची कबुली वखारींना तटबंदी बांधण्याची परवानगी ब्रिटिशांना मिळाली.

**सिराज उद्दौला विरुद्ध कट :**

या काळात नवाबाच्या दरबारात राजकीय असंतोष उफाळून आला होता, ज्याचा फायदा ब्रिटिशांनी घेतला. मार्च 1757 मध्ये ब्रिटिशांनी फ्रेंचांचा पराभव करून चंद्रनगर ताब्यात घेतले. नवाबाचे प्रमुख अधिकारी नाराज असल्याने ब्रिटिशांनी त्यांना फितूर बनवले. नवाबाच्या विरुद्ध एक कट बनवला. या कटामध्ये सेनापती मीरजाफर (अलीवर्दीखानाचा मेहुणा), खजिनदार राय दुर्लभ, सावकार जगत सेठ, यारलतीफ व अमीरचन्द यांना समाविष्ट केले गेले.

प्लासीची लढाई, (23 जून 1757).

प्लासीची लढाई ही एक महत्त्वपूर्ण व परिणामकारक घटना होती. ज्यामुळे भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाले. सध्याच्या मुर्शिदाबादजवळील भागीरथी नदीकाठी प्लासी (पलाशी) येथे बंगालचा नवाबाने ब्रिटीश सैन्याचा सामना केला. नवाबाच्या सैन्यसंख्येचा विचार करता ब्रिटिशांचा विजय अशक्य होता. नवाबाच्या सैन्याची संख्या 50,000 होती, ज्यामध्ये 5000 घोडदळ, 35000 पायदळ व 50 बंदूकचींचा समावेश होता. नवाबाला मदत म्हणून फ्रेंचांनी पन्नासहून अधिक तोफा पाठवल्या होत्या. याउलट रॉबर्ट क्लाइव्हकडे 3000 इतके सैन्य होते. ज्यात 700 ब्रिटीश व युरोपियन सैन्य, 100 तोपची व 2100 भारतीय शिपायांचा (पायदळ) समावेश होता.

**युद्धाचे स्वरूप:**

कलकत्ता (कोलकाता) च्या उत्तरेस सुमारे 100 मैल (160 किमी) अंतरावर प्लासी (पलाशी) या छोट्याशा गावाजवळ भागीरथी-हुगळी नदीच्या काठावर नवाब व ब्रिटीशांच्या सैन्याची गाठ पडली. नवाबाकडे असलेल्या फ्रेंच तोफखान्याने प्रथम गोळीबार केला, त्यानंतर बंगाली तोफांनी गोळीबार केला. ब्रिटीश बंदुकांनी प्रत्युत्तर दिले. बंगाली घोडदळ फ्रेंच बंदुकांच्या जवळ

Dr. S. R. Katimani History of Modern India

असल्यामुळे, क्लाईव्हच्या भडिमारामुळे तोफखाना चुकला पण घोडदळाचे नुकसान झाले, त्यामुळे नवाबला त्यांना संरक्षणासाठी मागे खेचणे भाग पडले. त्यानंतर मुसळधार पावसामुळे लढाईत व्यत्यय आला. ब्रिटीश तोफखान्यांनी त्वरीत त्यांची तोफ आणि दारूगोळा ताडपत्रींनी झाकून टाकला. परंतु नवाबाच्या सैन्यानी असे न केल्याने त्यांचा तोफखाना निकामी झाला.

प्रत्यक्ष युद्धावेळी मीर जाफर, सुमारे एक तृतीयांश बंगाली सैन्यासह, नवाबाच्या विनंतीनंतरही, लढाईत सामील न होता तटस्थ राहिले. त्यामुळे प्लासीच्या लढाईत ब्रिटीशांनी फंदफितुरीने विजय मिळवला. शेवटी मीर जाफरचा मुलगा मीरन याने 2 जुलै, 1757 रोजी सिराजला पकडून ठार मारले. यानंतर सिराजच्या जागी नवाब म्हणून मीर जाफर याची नियुक्ती ब्रिटीशांनी केली. प्लासीच्या युद्धात ब्रिटीशांकडील केवळ 27 लोक मारले गेले आणि 50 जखमी झाले. तर नवाबकडील 500 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला.

**प्लासीच्या लढाईचे परिणाम :**

प्लासीच्या लढाईत ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचा विजय हा भारतातील सुमारे दोन शतकांच्या ब्रिटिश राजवटीची सुरुवात होती. या युद्धात ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचा विजय झाला व भारतातील ब्रिटीशांच्या सत्ता स्थापनेचा पाया घातला गेला.प्लासीच्या लढाईचे पुढील काही परिणाम सांगता येतील.

i. बंगालच्या नवाबाकडून मिळालेल्या प्रादेशिक व व्यापारी सवलतीमुळे इंग्रजांच्या सैनिकी सामर्थ्यात वाढ झाली.

ii. पुढील काळात इंग्रज हे अधिक आक्रमक व साम्राज्यवादी बनले.

iii. बंगालच्या भूमीचा वापर करून पुढील काळात इंग्रजांना मराठे, निजाम, भोसले, फ्रेंच व टिपू यांचा पाडाव करता आला.

थोडक्यात प्लासीच्या लढाईने भारतातील इंग्रजी सत्तेचा पाया घातला गेला.

मॅलेसन यांच्या मते, प्लासीच्या लढाई इतके सखोल, कायमस्वरूपी असे परिणामकारक युद्ध कधीही झाले नाही. *(There never was a battle in which the consequences were so vast, so immediate and so permanent )*

डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतात, *Plassey made the English masters of Bengal from whence within the next hundred years they overran the whole of India.*

**बक्सारची लढाई**

**प्रस्तावना :**

प्लासीच्या लढाईने भारतातील ब्रिटिशांच्या राजकीय सत्तेचा पाया घातला गेला. ब्रिटिशांनी मीर जाफरला बंगालचा नामधारी शासक बनवून सत्तेची सर्व सूत्रे रॉबर्ट क्लाइव्ह व इंग्रजांच्या हाती आली. 1759 मध्ये आलमगीर द्वितीयच्या मृत्यूनंतर अली गौहर उर्फ शाह आलम हा मोगल सम्राट बनला. ब्रिटीशांची बंगालवरील मक्तेदारी मोडून काढण्यासाठी 1760 मध्ये त्याने बिहारवर आक्रमण केले पण त्याला यश मिळाले नाही.

**मीर कासिम :**

मीर कासिम हा बंगालचा नवाब मीर जाफरचा जावई होता व त्याच्या काळात हा रंगपूर व पूर्णिया जिल्ह्याचा शासक होता. मीर कासिमने येथील प्रशासन व्यवस्था उत्कृष्ट पद्धतीने सांभाळली होती. मीर जाफरच्या अन्याय व अत्याचाराला बंगाल मधील जनता कंटाळली होती. त्यामुळे बंगालमधील अराजकता व गोंधळ दूर करण्यासाठी ब्रिटिशांनी मीर जाफरला पदच्युत करून मीर कासीमला नवाब बनवण्याचे ठरवले. त्यानुसार 27 सप्टेंबर, 1760 रोजी बंगालचा गव्हर्नर वेंसीटॉर्ट आणि नवाबाचा जावई मीर कासिम यांच्यामध्ये एक गुप्त करार झाला. ज्याद्वारे मीर जाफरला पदत्याग करण्यास भाग पाडले गेले. करारातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत :

- ब्रिटीशांनी मीर कासिम याला नवाब बनवावे .

Dr. S. R. Kattimani History of Modern India

- मीर कासिम ने ब्रिटिश कंपनीला मिदनापूर चितगाव व बरद्वान हे तीन जिल्हे द्यावे.
- मीर जाफरला वार्षिक 15000 रुपयांचे पेन्शन द्यावे.
- यानुसार ऑक्टोबर 1760 मध्ये मीर कासिम हा बंगालचा नवाब बनला.

**मीर कासीमच्या सुधारणा :**

मीर कासिम हा एक मुत्सद्दी, अनुभवी व कर्तबगार व्यक्ती असल्यामुळे त्याने ब्रिटीशांची सर्व देणी देऊन बंगालला ब्रिटिशांच्या वर्चस्वातून मुक्त करण्यासाठीचे प्रयत्न सुरू केले. यासाठी त्याने बंगालमधील शासनाचे जमीन महसूल उत्पन्न वाढवले. पाटण्याचा गव्हर्नर राजनारायण हा नवाबाच्या आज्ञा पाळत नव्हता त्याला मीर कासीमने पदच्युत केले. बंडखोर व भ्रष्ट जमीनदारांना शिक्षा केल्या.

- ब्रिटिशांच्या राज्यकारभारातील हस्तक्षेप दूर व्हावा म्हणून मीर कासीमने राजधानी मुर्शिदाबाद येथून मोंगीरला हलवली.
- चाळीस हजार सैन्यासह तटबंदी बांधून राजधानीस संरक्षण प्रधान केले.
- लष्करी प्रशिक्षणासाठी फ्रेंच व जर्मन सैन्य तज्ञांना नेमले. गुरगीन खान या एका आर्मेनियन व्यक्तीस आपल्या सैन्यात नियुक्त केले.
- सैनिकांच्या संख्येमध्ये व शक्तीमध्ये वाढ केली ज्याद्वारे सैन्य व्यवस्था सक्षम केली.
- राजधानी मुंगेर येथे तोफा व बंदुकांच्या निर्मितीसाठी कारखाने उघडले.

**बक्सारच्या लढाईची कारणे**

**1. बंगालच्या सत्तेचा प्रश्न :**

बंगालचा नवाब बनल्यानंतर मीर कासीमने ब्रिटिशांची सर्व देणी भागवली. मीर कासिमला आपल्या अधिकार व कर्तव्यांची जाणीव होती. त्याने ब्रिटिशांच्या हातचे बाहुले बनण्यास नकार दिला. इंग्रजांना नवाबाची ही स्वतंत्रता व आत्मनिर्भरता नकोशी झाली होती. यातूनच नवाब व ब्रिटिश यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला.

**2. मीर कासिमची योग्यता हेच ब्रिटिशांबरोबरच्या संघर्षाचे कारण बनले :**

मीर कासीमने बंगालच्या प्रशासनामध्ये अनेक बदल केले व सुधारणा घडवून आणल्या. परंतु ब्रिटिशांना बंगालच्या नवाबाचे हे स्वतंत्र वृत्तीने वागणे मान्य नव्हते.

**3. मोगल सम्राटाचा वारसा प्रश्न :**

1761 मध्ये शहाआलमने मोगल सम्राट बनण्यासाठी इंग्रजांची मदत मागितली. इंग्रजांनीही पाटणा येथे त्याचे भव्य स्वागत केले. इंग्रजांच्या दबावामुळे मीर कासिमला शहाआलम यांना मोगल सम्राट बनवण्यासाठी बारा लाख रुपये द्यावे लागले. इंग्रज शाहआलमकडून बंगाल, बिहार व ओरिसाची दिवाणी प्राप्त करतील अशी भीती मीर कासिमला असल्याने इंग्रज व मीर कासिम यांच्यामध्ये तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

**4. रामनारायण प्रकरण :**

ब्रिटिशांच्या मर्जीतील पाठण्याचा नायब सुभेदार रामनारायण हा एक सामर्थ्यवान जमीनदार होता. हा नवाबाविरोधी कारवाया करत असल्याने नवाबाने त्याची संपूर्ण संपत्ती जप्त केली. हा ब्रिटीशांच्या मर्जीतील असल्याने ब्रिटीश व नावाबात या प्रकरणामुळे वितुष्ट वाढले.

**5. दस्तक परवान्याबाबत नवाबाचे  धोरण :**

मोगल बादशहा फर्रूखसियरने ब्रिटिशांना बंगालमध्ये करमुक्त व्यापाराचा दस्तक परवाना दिला होता. परंतु ब्रिटिश अधिकाऱ्यांनी या दस्तकपरवान्याचा गैरवापर करून खाजगी व्यापाराद्वारे भरपूर पैसा कमावला. परंतु यामुळे बंगालच्या उत्पन्नात घट झाली. मीर कासीमने कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार करून खाजगी व्यापार थांबवण्याचा प्रयत्न केला, परंतु ब्रिटिश अधिकाऱ्यांनी नवाबाला दाद दिली नाही. यावर मीर कासीमने भारतीय व्यापाऱ्यांना ही करमुक्त व्यापाराची सवलत देऊ केली. शेवटी इंग्रजांनी नवाबाला धडा शिकविण्यासाठी युद्ध पुकारले.

Dr. S. R. Katimani, History of Modern India

**6. सैनिकी प्रश्नाबाबत मतभेद :**

ब्रिटिश सैन्याचा वापर आपल्या विरोधात होत असल्याने मीर कासीमने बरद्वान, मीदनापूर व चितगाव ह्या जिल्ह्याची मागणी पुन्हा इंग्रजांकडे केली. यामुळे इंग्रज व नवाबामध्ये संघर्ष सुरू झाला. नवाबाने कलकत्ता कौन्सिल द्वारा पाठवलेल्या इंग्रज प्रतिनिधींना बंदी बनवले. पाटणा येथील इंग्रज वखारीचा प्रमुख एलिसने पाटण्यावर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला पण त्यात तो अपयशी ठरला व नवाबाने त्याला कैद केले. नवाबाने पुन्हा पाटण्यावर आपला अधिकार प्रस्थापित केला.

डॉडवेल यांनी आपल्या 'दि केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया' या ग्रंथामध्ये म्हणतात की, इंग्रज व नवाबाचे हित एकमेकांच्या विरोधी असल्याने संघर्ष झाला. (Dodwell says, The war between the Nawab and the company was a war of circumstances rather than of intentions.)

**मीर कासिम व इंग्रज संघर्ष:**

जून 1763 मध्ये मेजर ॲडम्स याने नवाबा विरुद्ध आघाडी उघडली. या दोघांमध्ये अनेक लढाया झाल्या. शेवटी मीर कासिम चा पराभव झाला व तो अयोध्येला जीव वाचवण्यासाठी पळून गेला. मीर कासिमशी युद्ध सुरू असतानाच इंग्रजानी 7 जुलै 1763 रोजी मीर जाफर याला पुन्हा नवाबपदी विराजमान केले.

**इंग्रजांविरुध्द भारतीय सत्ताधीशांची संयुक्त आघाडी :**

निराश झालेल्या मीर कासीमने आपल्या ताब्यातील युद्धकैद्यांना ठार मारणे सुरु केले व यात इंग्रज होते. इंग्रजांपुढे आपला निभाव लागणार नाही हे पाहताच नवाब मीर कासिम खजिन्यासह अवधला निघून गेला. ह्याच वेळी दिल्लीचा सम्राट शाह आलम अवधच्या आश्रयाला गेला. 1761 मध्ये पानिपतच्या तिसऱ्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाल्यावर शाह आलमने दिल्ली सोडली व नवाब शुजाउद्दौलाकडे आश्रयास येऊन राहिला. अशाप्रकारे मीर कासिम, शुजाउद्दौला व मोगल सम्राट शहाजहान यांची एक संयुक्त आघाडी इंग्रजांविरुद्ध तयार झाली.

**बक्सारची लढाई :**

मीर कासिम याने अयोध्या येथे जाऊन अवधचा नवाब शुजाउद्दौला याची मदत मिळवली. यांना मोगल बादशहा शहा आलम यानेही पाठिंबा दिला. यानंतर मोगल बादशहा, मीर कासिम व शुजाउद्दौला यांचे संयुक्त सैन्य बिहारकडे निघाले.

इंग्रजांनीही लढण्यासाठीची तयारी केली. उभयतांची गाठ 23 ऑक्टोबर, 1764 रोजी गाजीपूर जवळील बक्सार येथे पडली. भारतीयांची संयुक्त सैन्य संख्या 50,000 इतकी होती. ब्रिटिशांकडे 7027 इतके सैन्य होते. यावेळी इंग्रज सेनेचे नेतृत्व मेजर हेक्टर मन्रो यांच्याकडे होते. प्रारंभी शुजाउद्दौलाची बाजू वरचढ वाटत होती. परंतु नंतर इंग्रज सैन्याने जोरदार हल्ला केला व इंग्रजांचा विजय झाला. या युद्धात इंग्रजांनी भारतीय संयुक्त फौजेचा पूर्ण पराभव केला. यामध्ये अवधचा नवाब शुजाउद्दौला याने शरणागती पत्करली. मोगल सम्राट शहाजहान यानेही शरणागती पत्करून तो इंग्रजांच्या आश्रयाला गेला. मीर कासिम दिल्लीला पळून गेला व तेथेच 1777 मध्ये त्याचा मृत्यू झाला. इंग्रजांकडील 847 सैनिक मृत्युमुखी पडले. भारतीयांच्या संयुक्त आघाडीतील दोन हजार सैनिक मारले गेले.

**इतिहासकारांची मते:**

१. सर जेम्स स्टीफनच्या मते, "भारतात इंग्रजी सत्तेचे बीजारोपण होण्यास प्लासीच्या लढाईपेक्षा बक्सारची लढाई जास्त कारणीभूत झाली".
२. इतिहासकार रॅम्से मूर म्हणतात, "Bauxar finally reverted the shackles of company's rule over Bengal".
३. ब्रुम या इतिहासकारांच्या मते, "बक्सारच्या युद्धामुळे केवळ बंगालचेच नव्हे तर संपूर्ण भारताचेच भवितव्य इंग्रजांच्या हाती आले."
४. डॉडवेलच्या मते नवाब आणि कंपनीत उद्भवलेला संघर्ष परिस्थितीमुळे होता, त्यामागे युद्धाचा उद्देश नव्हता.

म्हणूनच असे म्हटले जाते की, प्लासीची लढाईने बंगालमध्ये इंग्रजी सत्तेचा पाया घातला गेला तर बक्सारच्या युद्धाने हा पाया पक्का झाला. "The Battle of Buxar decided the future of India".

**बक्सारच्या लढाईचे महत्त्व व परिणाम**

Dr. S. R. Katimani History of Modern India

बक्सारची लढाई ही फक्त राजकीयदृष्ट्याच नाही तर सैनिकीदृष्ट्या ही महत्त्वपूर्ण होती. प्लासीच्या लढाईतील विजय हा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने फंद-फितुरीने व कपटनीतीने मिळवलेला होता परंतु बक्सारच्या लढाईत ब्रिटिशांनी आपले सैनिकी श्रेष्ठत्त्व सिद्ध केले.

बक्सारच्या विजयामुळे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी ही केवळ व्यापारी कंपनी न राहता ती भारतातील एक प्रमुख राजकीय सत्ता म्हणून उदयास आली.

- इंग्रजांच्या प्रशिक्षित आधुनिक फौजेपुढे एतद्देशीय फौजेतील दुर्बलता स्पष्ट झाली.
- मोगल बादशहा, त्याचा सुभेदार व वजीर यांच्या संयुक्त सामर्थ्यापेक्षा इंग्रजांचे सामर्थ्य जास्त प्रभावी असल्याचे सिद्ध झाले.
- थोडक्यात ईस्ट इंडिया कंपनीचा भारतीय राजकीय प्रभावामध्ये दबदबा निर्माण झाला.

**म्हैसूर प्रांत -**

विजयनगर सम्राज्याची स्थापना 1336 साली हरिहर आणि बुक्का यांनी केली. 1565 मध्ये थाळीकोटाच्या लढाईत पराभव झाल्याने विजयनगर सम्राज्याचे विघटन झाले. त्यातीलच एक भाग 1712 मध्ये म्हैसूर च्या राज्याच्या रूपाने नावारूपास आला. ज्यावर ओडियार घराण्याची सत्ता प्रस्थापित झाली. म्हैसूरच्या राज्याचा 17 व्या शतकात विकास झाला. चिक्क कृष्णराज-II हा 1734 मध्ये गादीवर बसला. जो मुत्सदी व कर्तबगार नव्हता. सर्व सत्ता मंत्री नंजराज व देवराज यांच्याकडेच एकवटली होती.

म्हैसूरचा राजा चिक्ककृष्णराज याच्या काळात 'देवराज' हा सेनापती होता. 'नंजराज' हा प्रधानमंत्री होता. नंजराज याच्याकडेच म्हैसूर राज्याचे वसुली व अर्थखाते ही होते. प्रत्यक्षात नंजराज हा लढाई व तहाच्या बाबींचे कामकाज पाहत असे त्यामुळे म्हैसूरच्या प्रशासनामध्ये अराजकता निर्माण झाली होती.

म्हैसूर प्रांत सधन होता. कोलारच्या सोन्याच्या खाणी, शेतीतील संपन्नता, मलबार किनाऱ्यावरील व्यापार यामुळे ब्रिटिश व अन्य भारतीय सत्ताधीश म्हैसूरकडे आकर्षित झाले.

**हैदर अलीचे पूर्व चरित्र:**

हैदर अलीचा पणजोबा वलीमहम्मद दिल्लीहून दक्षिणेत गुलबर्गा येथे आला. हैदर अलीचा जन्म 1720 मध्ये बुंदीकोट येथे झाला. वडील फतह मुहम्मद (जन्म -कोलार) व आई लालबाई यांचा हा पाचवा मुलगा होय. ओडियार राजाने हैदरचा भाऊ शहाबाज याला शंभर घोडदळ व दोन हजार पायदळाचा प्रमुख म्हणून नेमले. याच्या ताफ्यात हैदरअली रुजू झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्याने लष्करी शिक्षण घेऊन म्हैसूरचा सेनापती नंजराज याच्या सैन्यामध्ये नोकरी स्विकारली. स्वतःच्या साहस व पराक्रमाच्या जोरावर हैदर अलीने आपली योग्यता सिद्ध केली. कर्नाटकच्या वारसा युद्धावेळी देवनहळळी किल्ल्याला वेढा दिला होता. यावेळी हैदर अलीने मोठा पराक्रम गाजवला.

हैदरअलीवर मुरारराव घोरपडे यांच्या पराक्रम व शिस्तीचा प्रभाव पडलेला होता. 1757 च्या पेशव्यांच्या श्रीरंगपट्टनमच्या स्वारीच्या वेळी हैदरअलीने मोठा पराक्रम केला होता. बाळाजी बाजीराव म्हणजेच नानासाहेब पेशवे यांच्या काळात हैदर अलीचा म्हैसूर मध्ये उदय झाला.

1755 मध्ये हैदर अलीला 1500 घोडदळ व 3000 पायदळाचा प्रमुख बनवले गेले. तसेच हैदर अलीला दिंडीगल या प्रांताचा फौजदार म्हणून नेमले गेले. 1757 मध्ये हैदर अलीने देवराज या सेनापतीला मराठी व हैदराबाद यांच्या तावडीतून म्हणजेच श्रीरंगपट्टणमच्या युद्धावेळी वाचवले होते. म्हैसूर प्रांतातील अराजकता पाहता हैदर अलीला राज्याचा प्रमुख होण्याची ही संधी मिळाली.

Dr. S. R. Kattimani History of Modern India

फ्रेंचाच्या मदतीने दिंडीगल येथे शास्त्रनिर्मितीचा कारखाना उभा केला. मराठे व निजाम यांचे सारखे आक्रमण होत. 1761 नंतर हैदर अलीने सर्व पाळेगार / जमीनदार यांच्याकडून करचुकवेगिरी व्हायची ती थांबवली.

पुढे काही काळाने नंजराज व हैदर यांच्यामध्ये वितुष्ट आले. त्याने काही प्रदेश जिंकून घेतले व शेवटी म्हैसूरची संपूर्ण सूत्रे आपल्या हाती घेतली. 1761 च्या पानिपतच्या युद्धानंतर हैदर अलीने आपला जम म्हैसूरमध्ये चांगला बसवला. आपली स्थिती भक्कम होताच म्हैसूरचा राजा चिक्ककृष्णराज यास कैदेत टाकून सर्व सत्ता त्याने आपल्या हाती घेतली.

आता म्हैसूर मध्ये हैदरच्या सैनिकी सामर्थ्यावर आवर घालणारा कोणीही नव्हता. मराठे, निजाम व ब्रिटिश या तिघांनी एकत्रितपणे हैदरला विरोध करण्यास सुरुवात केली. पुढे मराठे व निजाम यांचा विरोध कमी झाला. परंतु ब्रिटिशांच्या दक्षिणेतील सत्तेला हैदरचा धोका निर्माण होऊ लागला. त्यामुळे ब्रिटिशांचा हैदर अली व नंतर टिपू सुलतानशी शेवटपर्यंत संघर्ष होत राहिला.

**प्रथम इंग्रज-म्हैसूर युद्ध (1766-69):**

**हैदर व मराठे संघर्षाची कारणे :**

1761 च्या पानिपतच्या तिसऱ्या लढाईनंतर पेशवेपद माधवरावांकडे आले. माधवराव पेशव्यांवर मराठ्याच्या साम्राज्य विस्ताराची व आर्थिक अडचणीतून मराठ्यांना मुक्त करण्याची जबाबदारी निर्माण झाली. तसेच कर्नाटकातील मराठ्यांच्या प्रदेशावरही लक्ष ठेवणे आवश्यक बनले होते. याच वेळी धाडसी व महत्त्वकांक्षी अशा हैदर अलीचा सामर्थ्यवान सत्ताधीश म्हणून उदय झालेला होता. म्हैसूरचे राज्य ताब्यात आल्यानंतर त्यांनी आपला साम्राज्यविस्तार करण्यास सुरुवात केली होती. 1763 मध्ये मराठ्यांच्या ताब्यातील हावेरी किल्ला आपल्या वर्चस्वाखाली त्याने आणला. मराठ्यांचा मांडलिक असलेल्या सावनूरच्या नवाबाचाही हैदरअलीने पराभव केला. हैदरअलीच्या सामर्थ्याची कल्पना पेशवे माधवरावांना आली होती म्हणूनच त्यांनी हैदरअलीवर चार स्वाऱ्या केल्या.

रघुनाथराव पेशव्याने हैदरअलीच्या वकिलांशी तहाची बोलणी केली व अत्यंत सौम्य स्वरूपाचा तह हैदर अलीवर लादला ज्याला अनंतपूरचा तह असे म्हटले जाते. रघोबादादाच्या अंतर्गत संघर्षामुळे त्याचा कायमचा काटा काढता आला नाही. पेशव्यांच्या कर्नाटकवरील स्वाऱ्यांच्या वेळी नंजराज हा नेहमी निजामाची मदत घेत असे.

**हैदरअली विरुद्ध संघ :**

हैदरअलीने कर्नाटकातील बल्लापूर, रायदुर्ग, चितळदुर्गच्या राज्यांना आपले मांडलिकत्व स्वीकारायला भाग पाडले. 1765 मध्ये मराठ्यांनी हैदरवर स्वारी करून गुत्ती व सावनूरचा प्रदेश परत मिळवला. निजामाने इंग्रजांशी हैदरविरुद्ध युती केली. बंगाल प्रांतातील मिळालेल्या राजकीय यशामुळे मद्रासमध्ये देखील अशाच प्रकारचे यश मिळेल या भावनेने इंग्रजांनी हैदर अलीविरुद्ध मराठे व निजामला हाताशी धरून त्रिकूट बनवला.

हैदर अली हा एक महत्त्वकांक्षी सत्ताधीश होता. त्याच्या उदयाने दक्षिणेमध्ये इंग्रज, निजाम व मराठ्यांच्या प्रभुत्वाला धोका पोहोचला. हैदर अलीमुळे ब्रिटिशांना मद्रास प्रांतामध्ये आपले वर्चस्व निर्माण करता येत नव्हते. ब्रिटिशांना भारतातून हाकलून लावण्यासाठी निजाम व मराठे या दक्षिण भारतातील सत्ताधीशांना एकत्र आणण्याचा प्रयत्नही हैदर अलीने केला होता, परंतु यात त्याला यश मिळाले नाही. याउलट 1766 मध्ये मराठे, इंग्रज व निजाम यांनी हैदर अलीच्या विरुद्ध एक संघ तयार केला.

1766 मध्ये मराठ्यांनी म्हैसूरवर केलेल्या आक्रमणामुळे पहिल्या इंग्रज-म्हैसूर युद्धास सुरुवात झाली. हैदरअलीने मराठ्यांना 35 लाख रुपये देऊ केले. यातील अर्ध्या रकमेच्या मोबदल्यात कोलार जिल्हा मराठ्यांना दिला. यामुळे मराठ्यांनी या युद्धातून आपले अंग काढून घेतले.

**हैदर-निजाम संबंध :**

Dr. S. R. Kattimani History of Modern India

कर्नाटकचा नबाब मुहम्मदअली हा ब्रिटिशांचा मित्र होता. सलाबतजंगला हैद्राबादचा निजाम फ्रेंचानी बनवले होते. नंतर आसफजहाँ हा निजाम बनला. ज्याला ब्रिटिशांनी व्यापारी मद्रास भागात वखारीसाठी परवाना मागितला. नकार मिळाल्याने इंग्रजांनी शहाआलम II या मोगल बादशहाकडून हा परवाना घेतला. शेवटी इंग्रजांनी निजामाला सात लाख रुपयांच्या बदल्यात व्यापारी सवलती घेतल्या. कर्नाटकचा नवाब हा निजाम व हैदर अली यांचा सामूहिक शत्रु होता. दोघांनी मिळून अर्काट वर आक्रमण केले.

याच दरम्यान कर्नाटकचा नवाब मुहम्मद अलीचा भाऊ महफूजखान हा इंग्रज व मुहम्मद अली यांचा शत्रू होता. त्याने निजामाला इंग्रजांविरुद्ध भडकवले शेवटी सप्टेंबर 1767 मध्ये निजामाने इंग्रजांशी केलेला तह मोडून हैदरअलीशी मैत्री केली. यानंतर हैदर व निजामाने मिळून ब्रिटिशांवर चाल केली.

यादरम्यान इंग्रजांनी हैदराबाद वर आक्रमण करण्यासाठी सैन्य पाठवले. हे पाहुन निजामाचे साहस संपुष्टात आले व त्याने मार्च 1768 मध्ये हैदरअलीची साथ सोडून इंग्रजांशी मैत्रीचा तह केला यातहानुसार,

**इंग्रज- निजाम मैत्रीचा तह :**

1. निजामाने इंग्रजांशी केलेला पूर्वीचा तह मान्य केला.

2. निजामाने हैदरअलीला विद्रोही मानून म्हैसूरवरील त्याच्या अधिकाराला अमान्य केले.

3. म्हैसूर वरील विजयानंतर म्हैसूरचे दिवाणी अधिकार इंग्रजाना दिले जातील असे निजामाने स्वीकारले.

या तहामुळे इंग्रज- म्हैसूर व हैदरअली व निजाम यांच्यात कायमचे शत्रुत्व निर्माण झाले.

कर्नल स्मिथने तिरुवामलई येथे झालेल्या युद्धात हैदर अलीचा पराभव केला. परंतु हैदरने खचून न जाता मोठ्या प्रमाणावर घोडदळ घेऊन ब्रिटिशांच्या ताब्यातील मद्रासवर 1769 मध्ये आक्रमण केले. मद्रास प्रांतातील ब्रिटिशांनी केलेला हस्तक्षेप पहिल्या इंग्रज- म्हैसूर युद्धाचे कारण ठरले.

यामुळे हैदर अली मित्ररहित बनला. परंतु त्याने साहस सोडले नाही. त्यांनी मुंबईहुन आलेल्या एका मोठ्या इंग्रजी सेनेला पराभूत करुन मंगलोर जिंकून घेतले. 1 मार्च,1769 रोजी इंग्रजांच्या मद्रास वखारीवर आक्रमण करून त्यांच्यावर तह लादला.

**4 एप्रिल, 1769 (मद्रासचा तह) :**

या तहानुसार,

1. एकमेकांचे जिंकलेले प्रदेश एकमेकांना परत करावेत.

2. हैदर अलीने कसर/कारूर जिल्हा इंग्रजांना दिला.

3. कंपनीने हैदरला युद्धाची नुकसानभरपाई देण्याचे कबुल केले.

4. हैदर अलीने इंग्रजांना ओनूर येथे वखार घालण्यास आणि मलबार किनाऱ्यावर चंदन व मिरे यांचा व्यापार करण्यास परवानगी दिली. या मोबदल्यात ब्रिटिशांनी शस्त्रास्त्रे, युद्ध साहित्य हैदर अलीला पुरवावे असे ठरले.

5. इंग्रजांनी म्हैसूर दरबारला 6 लाख रुपयांचा नजराणा देण्याचे कबूल केले.

6. बाह्य शक्तीने कोणावरही आक्रमण केल्यास एकमेकांना मदत करण्याचे अभिवचन दिले.

अशाप्रकारे इंग्रज व म्हैसूर पहिल्या युद्धाची समाप्ती झाली.

Dr. S. R. Kattimani History of Modern India

यामुळे हैदरअलीचा दक्षिणेत नावलौकिक झाला. परंतु ब्रिटिशांची मात्र नाचक्की झाली. याचे कारण ब्रिटिशांवर मद्रासचा तह हा अपमानकारकरित्या स्वीकारला गेल्याची जाणीव त्यांना वाटत होती.

खरेतर या तहानुसार हैदर व इंग्रज मित्र बनले होते. परंतु 1771 मध्ये मराठ्यांनी हैदरअलीवर आक्रमण केले त्यावेळी इंग्रजांनी त्यांना मदत केली नाही यामुळे इंग्रज व हैदर यांच्यातील वितुष्ट कायम राहिले.

**हैदरअलीचे मूल्यमापन :**

हैदर अलीने फ्रेंच तज्ज्ञांच्या मदतीने मोठे शस्त्रागार उभारले. म्हैसूर राज्याच्या प्रशासनामध्ये मुख्य दिवाण व अनेक उच्चपदस्थ अधिकारी हिंदू नेमले. हैदर अली हा अशिक्षित परंतु धर्मनिरपेक्ष होता. तसेच तो उत्तम प्रशासक, संघटक, महत्त्वकांक्षी, पराक्रमी व कुशल सेनापती होता.

- **द्वितीय इंग्रज म्हैसूर युद्ध (1780-84)**

द्वितीय इंग्रज म्हैसूर युद्धाची पुढील कारणे सांगता येतील.

1. **इंग्रजांनी मद्रासच्या तहाचे पालन केले नाही :**

दक्षिणेतील निजाम व हैदर अली हे दोघे सत्ताधीश इंग्रजांवर नाराज होते. 1768 मध्ये निजामाशी झालेल्या तहानुसार इंग्रजांनी प्रतिवर्षी सात लाख रुपये निजामाला द्यायचे कबूल केले होते. ज्याचे पालन इंग्रजांनी केले नाही. तसेच निजामाचा नातलग बसालतजंगकडून गुंटूर हा जिल्हा जिंकून घेतला. त्यामुळे निजाम हा इंग्रजांवर नाराज होता. 1771 मध्ये मराठ्यांनी हैदरवर आक्रमण केले असताना, 1769 च्या हैदर व इंग्रज यामध्ये झालेल्या मद्रासच्या तहानुसार इंग्रजांनी हैदरला मदत करणे अपेक्षित होते. परंतु इंग्रजांनी मदत न केल्याने हे मद्रासच्या तहाचे उल्लंघन होते.

2. **इंग्रजांचा माहीमवर ताबा :**

हैदरअलीने इंग्रजांचे गुंटूर वरील अधिकार मान्य केले नाही. हैदर अलीचे फ्रेंचांशी मैत्रीपूर्वक संबंध होते. 1778 मध्ये अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धावेळी वसाहतवाल्याना फ्रेंचांनी मदत केली होती. याचा बदला घेण्यासाठी 1779 मध्ये फ्रेंचांच्या ताब्यातील माहीम इंग्रजांनी जिंकून घेतले. या गोष्टीचा बदला घेण्याचा निर्धार हैदर अलीने केला.

3. **हैदरअलीची फ्रेंचांशी असणारी मित्रता :**

व्यापारी वस्तू व युद्धसामग्रीचा पुरवठा यासारख्या हितसंबंधामुळे फ्रेंच हे हैदरअलीचे मित्र बनले होते. इंग्रजांनी फ्रेंचांच्या ताब्यातील मलबार किनाऱ्यावरील माहे या बंदरावर आक्रमण करून जिंकून घेतले. युरोपातून आवश्यक तो माल माहिम या बंदरातून मिळत असल्याने हे एक व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे बंदर होते. यामुळे माहीम इंग्रजांनी जिंकून घेतल्याने देखील इंग्रज-हैदर यांच्यात संघर्ष होण्यास मदत झाली.

4. **हैदरद्वारा इंग्रजांच्या विरुध्द त्रिकूटाची निर्मिती** :

याच दरम्यान इंग्रज- मराठा प्रथम युद्धास सुरुवात झाली होती. हैदर अलीने मराठे व निजाम यांच्याशी संधान साधून इंग्रजांविरुद्ध एतद्देशीय शक्तींचा त्रिकूट बनवला. यानुसार बरार व मध्य भारतातून होऊन उत्तर भारतातील इंग्रजांच्या प्रदेशावर मराठे आक्रमण करतील. उत्तरेतील इंग्रजांच्या ताब्यातील जिल्ह्यांवर निजामाचे आक्रमण होईल. मद्रास व त्याजवळील इंग्रजांच्या प्रदेशावर हैदरअलीचे आक्रमण करावे असे ठरवले गेले.

5. **हैदर अलीची कर्नाटकवर स्वारी** :

Dr. S R Kattimani History of Modern India

जुलै 1780 मध्ये 80000 सैन्य व 100 तोफासह हैदर अलीने कर्नाटकवर स्वारी केली. अनेक गावांची जाळपोळ व लुटालूट करत कर्नाटकची राजधानी अर्कोटला वेढा दिला. त्यामुळे नवाब मुहम्मदअली भीतीने मद्रासला इंग्रजांच्या आश्रयाला गेला. ब्रिटिशांनी व्हिक्टर मन्रो व कर्नल बेली यांच्याबरोबर सैन्याच्या दोन तुकड्या देऊन त्यांना हैदरच्या बंदोबस्तासाठी पाठवले; परंतु या ब्रिटिशांच्या दोन्ही तुकड्यांची एकत्र गाठ पडण्यापूर्वीच टिपूने कांजीवरम येथे कर्नल बेलीचा मोठा पराभव केला. हैदर अलीने ऑक्टोबर 1780 मध्ये अर्काट जिंकून घेतले.

1781 मध्ये सर आयरकुटने हैदरअलीचा पोर्टोनोव्हाच्या लढाईत पराभव केला. त्यामुळे टिपूला वादिवांशचा वेढा उठवावा लागला. कर्नल पियर्सच्या नेतृत्त्वामध्ये बंगालहुन आलेली इंग्रज सेना आयरकुटच्या सेनेस येऊन मिळाली. इंग्रजांच्या या संयुक्त सेनेशी पोलीलूर येथे हैदर अलीचे युद्ध झाले परंतु युद्धाचा निकाल अनिर्णयात्मक राहिला. सप्टेंबर 1781 मध्ये आयरकुटने हैदर अलीचा शोलींगुर/ शोलिंगपूर येथे पराभव केला, परंतु नोव्हेंबर मध्ये इंग्रजांचा पराभव झाला. परंतु तंजावरच्या युद्धात टिपूने कर्नल ब्रॉथवेटचा पराभव केला व तंजावर जिंकून घेतले.

परंतु यावेळी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टींग्ज याने मोठ्या मुत्सद्देगिरीने मराठे व निजाम यांना हैदर अलीपासून अलग केले. त्याने निजामाला गुंटुर जिल्हा दिला त्यामुळे निजाम या युद्धातून बाहेर पडला. तसेच मराठ्यांचे शिंदे व भोसले या सरदारांनाही या युद्धातून माघार घेण्यास ब्रिटिशांनी बाध्य केले. शेवटी हैदर अली ह्या एकट्या सत्ताधीशांने इंग्रजांशी लढण्याचा निर्धार केला.

त्याच दरम्यान सेनापती बुसीच्या नेतृत्वामध्ये 2000 फ्रेंच सैन्य हैदरच्या मदतीस आल्याने फ्रेंचांनी ब्रिटिशांचे कुडालोर व त्रिकोमाली हे ठिकाणी जिंकून घेतली.

मे 1782 मध्ये आरणा येथे सेनापती आयरकुट आणि हैदर यांच्यात लढाई झाली. यामध्ये आयरकुटचा पराभव झाला. समुद्रकिनाऱ्यास सोडल्यास कर्नाटकातील इंग्रजांच्या सर्वच भूभाग हैदर अलीने जिंकून घेतले.

इंग्रजांकडून मलबार जिंकण्यासाठीचा प्रयत्न अयशस्वी ठरला. अशातच पावसाळा सुरू झाल्याने कोणाचाच निर्णायक विजय होऊ शकला नाही. या दरम्यान 7 डिसेंबर, 1782 रोजी हैदर अलीचा कॅन्सरमुळे मृत्यू झाला.

पित्याच्या मृत्यूनंतरही टिपूने इंग्रजांशी युद्ध सुरूच ठेवले. ब्रिगेडियर मॅथ्यूजच्या नेतृत्वामध्ये मंगलोर व बेदनूर जिंकण्यासाठी पाठवले परंतु टिपूने त्यांचा पराभव करून कैद केले. जून 1783 मध्ये फ्रेंच - इंग्रज तह झाल्याने फ्रेंचांनी युद्धातून माघार घेतली. यामुळे टिपूची बाजू कमकुवत झाली. इंग्रजांनी पालघाट व कोयंबतूर जिंकून घेतले.

कर्नल फुलरटनने आपला मोर्चा म्हैसूरची राजधानी श्रीरंगपट्टनमकडे वळवला. यावेळी मद्रासचा गव्हर्नर मर्कार्टने आर्थिक अडचणीमुळे त्याला परत बोलावले. या सर्व गोष्टींमुळे टिपूनेही तहाची इच्छा दाखवली. 7 मार्च, 1784 रोजी टिपू व इंग्रजामध्ये मंगलोरचा तह होऊन दुसरे इंग्रज म्हैसूर युद्ध संपुष्टात आले.

**मंगलोरच्या तहातील अटी (7 मार्च, 1784) :**

1. ब्रिटिश व टिपू या दोघांनी युद्धात एकमेकांचे जिंकलेले प्रदेश परत द्यावेत.
2. एकमेकांच्या युद्धकैदयाची सुटका करावी.
3. इंग्रजांनी टिपूला आवश्यक त्यावेळी मदत करावी.
4. टिपू व म्हैसूरच्या बाबतीत यापुढे इंग्रज हस्तक्षेप करणार नाहीत.

मद्रासचा गव्हर्नर मेकॉर्ट याने हा तह घडवून आणला होता. परंतु या तहातील अटी गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्जला पसंत नव्हत्या.

**टिपू सुलतान :**

Dr. S. R. Kattimani History of Modern India

टिपू सुलतानचा जन्म 1 डिसेंबर 1751 रोजी कर्नाटकातील देवनहळी येथे झाला. हा पराक्रमी, चारित्र्यसंपन्न व महत्त्वकांक्षी होता. त्याला फ्रेंच व कन्नडसहित अनेक भाषांचे ज्ञान अवगत होते. वडील हैदर अलीबरोबर त्याने अनेक युद्धांमध्ये सहभाग घेतल्याने युद्धाचा मोठा अनुभव त्याला होता. परंतु आपल्या शत्रूंना आपल्या विरुद्ध एकत्र येऊ न देण्याची हैदरअली इतकी मुत्सद्देगिरी त्याच्यात नव्हती. त्याचा तोफखाना उत्कृष्ट होता. फ्रेचांवर अनावश्यक विश्वास ठेवल्याने त्याचा ऱ्हास झाला असे म्हणावे लागेल. 'म्हैसूरचा वाघ' म्हणून तो इतिहासात प्रसिद्ध आहे. जेम्स मिलने टिपूचा उत्तम प्रशासक म्हणून गौरव केला होता. टिपूने ब्रिटिश लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले होते, परंतु भारतातील ब्रिटिशांच्या शत्रूंची मदत मिळविण्यात त्याला यश आले नाही.

**तिसरे इंग्रज-म्हैसूर युद्ध-(1790-92) :**

वॉरन हेस्टिंग्ज इंग्लंडला परत गेल्यावर त्याच्या जागी लॉर्ड चार्लस कॉर्नवॉलीस भारतामध्ये बंगालचा गव्हर्नर जनरल म्हणून कलकत्याला आला. इंग्लंडचा पंतप्रधान विल्यम पिटने विशेष कायदा करून कॉर्नवालीसला गव्हर्नर जनरल व सरसेनापती यांचे हक्क बहाल केले. तसेच गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळाचा सल्ला धुडकावून लावण्याचा हक्क कॉर्नवालीसला दिला.

कॉर्नवॉलिसने पुण्याचा इंग्रज वकील मॅलेट यांच्यामार्फत मराठ्यांची मदत घेतली. दुसऱ्या इंग्रज म्हैसूर युद्धानंतर टिपू बरोबर मंगलोरचा तह इंग्रजांनी केलेला होता. या तहाचे अपमानास्पद शल्य इंग्रजांना सारखे टोचत होते.

याच दरम्यान युरोपमध्ये इंग्रज व फ्रेंच युद्ध सुरू होते. टिपूच्या मदतीने फ्रेंच इंग्रजांचे हिंदुस्तानातून उच्चाटन घडवून आणतील म्हणून टिपूचा बंदोबस्त करणे कॉर्नवालीसला गरजेचे वाटू लागले.

टिपूने मंगलोरच्या तहान्वये इंग्रज कैद्यांना मुक्त केले नव्हते. उलट त्याने या कैद्यांना जबरदस्तीने बाटवून मुसलमान बनवले. त्यामुळे टिपूचा कॉर्नवालीसला राग आलेला होता.

1782 मध्ये गुंटूरचा प्रदेश टिपूला निजामाकडून मिळाला होता. इंग्रजांनीही याला मान्यता दिली होती. परंतु निजामाला आता हा प्रदेश परत मिळवायचा होता. म्हणून त्याने ब्रिटीशांची मदत घेण्याचे ठरवले. त्यामुळे टिपू संतप्त झाला. त्याने ताबडतोब ब्रिटीशांच्या ताब्यातील त्रावणकोर राज्यावर डिसेंबर 1789 हल्ला चढवला. यातूनच तिसरे इंग्रज-म्हैसूर युद्ध उद्भवले.

हैदर अलीच्या मृत्यूनंतर टिपूने इंग्रजांना भारतातून हाकलून लावण्यासाठी फ्रेंचाकडून मदत मिळवण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यात त्याला यश मिळाले नाही. तेव्हा टिपूने इंग्रजांना धडा शिकवण्यासाठी डिसेंबर 1789 मध्ये दक्षिणेकडील त्रावणकोर वर हल्ला केला. परंतु मद्रासच्या गव्हर्नरने याकडे लक्ष दिले नाही.

**टिपू विरुध्द त्रिकुटाची निर्मिती :**

मात्र कॉर्नवॉलिसने टिपूला एकटे पाडण्यासाठी 1 जून 1790 रोजी मराठ्यांबरोबर आणि 4 जुलै 1790 रोजी निजामाबरोबर मैत्रीचा तह केला. ह्या दोघांनी इंग्रजांना लष्करी मदत देण्याचे ठरवले, तसेच टिपूचा जो अर्धा प्रदेश जिंकून घेतला जाईल त्याचा काही हिस्सा इंग्रज त्यांना देतील असे ठरले.

अशाप्रकारे टिपू विरोधी एक संघ तयार झाला. युद्धाची तयारी झाल्यानंतर कॉर्नवॉलिसने टिपू विरुद्ध युद्धाची घोषणा केली. टिपूने मोठ्या धैर्याने व चिकाटीने इंग्रजांशी मुकाबला केला. जनरल मेडोजच्या नेतृत्वाखाली इंग्रजांची मोहीम यशस्वी ठरली नाही. परिणामी, डिसेंबर 1790 मध्ये लष्कराचे नेतृत्व स्वतः लॉर्ड कॉर्नवालीसने स्वीकारले आणि त्याने वेल्लोरवर आक्रमण केले, तसेच मार्च 1791 मध्ये बेंगलोरवर आक्रमण करून ते जिंकून घेतले. याच दरम्यान निजामाने दहा हजार घोडदळ व मराठ्यांनी दहा हजार पायदळासह युद्धात भाग घेतला. नोव्हेंबर 1791 मध्ये या संयुक्त फौजांनी संयुक्तपणे टिपूवर आक्रमण केले.

Dr. S. R. Katimani History of Modern India

ब्रिटिशांनी टिपूचे बेंगलोर हे मुख्य ठाणे जिंकून घेतले व कोयम्बतूर काबीज केले. त्यानंतर श्रीरंगपट्टणमच्या किल्ल्यावर आक्रमण करून किल्ला आपल्या ताब्यात घेतला. दरम्यान मराठ्यांनी टिपूचा बराचसा प्रदेश बेचिराख करून त्याची रसद बंद केली. मराठ्यांचे हरिपंत फडके व परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या नेतृत्त्वाखाली मराठा फौजेने टिपूच्या म्हैसूरचा बराचसा प्रदेश जाळून बेचिराख केला. टिपूने अत्यंत खंबीरपणे ब्रिटिश मराठे व निजाम यांच्या फौजेचा प्रतिकार केला. पण त्यास यश आले नाही. अशी प्रतिकूल परिस्थिती पाहून टिपूने कॉर्नवालीसबरोबर युद्ध बंदीची घोषणा केली. 18 मार्च 1792 मध्ये श्रीरंगपट्टणमचा तह टिपू व कॉर्नवालीस यांच्यात होऊन तिसरे म्हैसूर युद्ध संपुष्टात आले.

**श्रीरंगपट्टणमचा तह – (18 मार्च 1792) :**

या तहातील कलमे खालील प्रमाणे आहेत.

1. इंग्रजांना मलबार, दक्षिणेकडील दिंडीगलचा किल्ला व त्याच्या आजूबाजूचा प्रदेश, पूर्व बारा महल व पर्वतीय मार्ग हा प्रदेश मिळाला .

2. युद्ध खंडणी म्हणून टिपूने इंग्रजांना 30 लक्ष पाऊंड द्यावे. युद्ध खंडणी मिळेपर्यंत टिपूची दोन मुले इंग्रजांकडे ओलिस ठेवण्यात आली.

3. टिपूच्या अर्ध्या राज्यातील कृष्णा व पेन्ना या दोन नद्यांमधील प्रदेश निजामाला दिला गेला.

4. कृष्णा व वर्धा या दोन नद्यांमधील प्रदेश मराठ्यांना मिळाला.

या तहामुळे टिपूला अर्ध्या राज्यावर पाणी सोडावे लागले. संधी चालून आलेली असतानाही इंग्रजांनी अर्धे राज्य टिपूच्या ताब्यात ठेवल्यामुळे अनेक लोकांनी याबाबत टीका केली. याबद्दल कॉर्नवॉलीस म्हणतो की, "आपल्या मित्रांना शक्तिशाली बनू न देता शत्रुला पांगळे करण्यात आपण यशस्वी झालो". दुसरे एक कारण म्हणजे टिपूला फ्रान्सकडून मदत मिळेल अशी भीती कॉर्नवालिसला वाटत असल्यामुळे त्यांनी या तहास मान्यता दिली.

म्हैसूरचे संपूर्ण राज्य जिंकले असते तर जिंकलेल्या राज्याचा निम्मा हिस्सा मराठे व निजामाला द्यावा लागला असता. या दोघांच्याही शक्तीत वाढ करण्याची ब्रिटिशांची इच्छा नसल्याने कॉर्नवॉलिसने टिपूचे अर्धे राज्य जिंकून त्याच्या सैनिकी सामर्थ्याचे खच्चीकरण केले.

**चौथे इंग्रज- म्हैसूर युद्ध (1798 - 99) :**

तिसऱ्या म्हैसूर युद्धामध्ये टिपूचा पराजय झाल्याने तो इंग्रजांचा प्रतिशोध घेण्याच्या शोधात होता. श्रीरंगपट्टणमच्या तहानुसार इंग्रजांनी टिपवर युद्ध खंडणी लादली व त्याचे अर्धे राज्यही यामध्ये गेले. दक्षिणेमधून इंग्रजी सत्तेचे उच्चाटन व्हावे यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. परंतु निजाम व मराठे यांच्याकडून टिपूला कोणत्याही प्रकारची मदत मिळाली नाही. म्हणून त्याने इंग्रजांविरुद्ध मदत मिळवण्यासाठी अरबस्थान, अफगाणिस्थान, मॉरिशस, इराण व तुर्कस्तान या राष्ट्रांकडे आपले वकील पाठवून दिले.

याच कालखंडात यूरोपमध्ये इंग्रज व फ्रान्स यामध्ये युद्ध सुरू झाले होते. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर नेपोलियन बोनापार्ट यांचा उदय झालेला होता. नेपोलियनने इजिप्तवर आक्रमण करून तेथून ब्रिटिशांच्या ताब्यातील भारत जिंकून घेण्याचे ठरवले. टिपूला या आंतरराष्ट्रीय परिस्थितीची पूर्ण कल्पना होती. फ्रेंचांनीही त्यांना मदत देऊ केली. टिपू हा स्वतः फ्रान्समधील जॅकोबिन क्लबचा सदस्य झाला. त्याने आपल्या सैन्यात फ्रेंच अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. मॉरिशसच्या गव्हर्नरने 150 सैनिक टिपूला मदत करण्यासाठी 1798 मध्ये मंगलोर येथे पाठवले.

Dr. S. R. Kattimani History of Modern India

12 ऑगस्ट 1798 रोजी लॉर्ड वेलस्ली याने एक अध्यादेश काढून निजाम मराठे व इंग्रज यांच्या संयुक्त आक्रमणाची भीती टिपूला दाखवली. निजामाने इंग्रजांना मदत देण्याचे ठरवले परंतु पेशव्यानी मात्र इंग्रजांना मदत करण्याचे टाळले. 5 मार्च, 1799 रोजी इंग्रजांनी चारी बाजूने म्हैसूरवर आक्रमण केले.

युद्धाचे नेतृत्व ऑर्थर वेलस्ली करत होता. पश्चिमेकडे जनरल स्टुअर्टने कन्नानोरकडे कूच केली. तसेच त्याने 6 मार्च 1799 रोजी सदासिरच्या युद्धात टिपूचा पराजय केला. जनरल हेरासने 27 मार्च 1799 रोजी मालवेलीच्या युद्धामध्ये टिपूचा पराभव केला.

उर्वरित सैन्य घेऊन टिपू सुलतान श्रीरंगपट्टणम येथील किल्ल्यात आश्रयाला गेला. ब्रिटिश फौजेने किल्ल्यास चारी बाजूंनी वेढा दिला व अनेक दिवस हे युद्ध चालू ठेवले. टिपूने अतिशय पराक्रमाने इंग्रजांचा प्रतिकार केला. पण शेवटी 4 मे, 1799 रोजी लढता-लढता टिपूचा मृत्यू झाला. म्हैसूर इंग्रजांच्या ताब्यात आले. टिपूच्या मृत्युनंतर त्याच्या कुटुंबियांना वेल्लोर येथे कैदेत ठेवण्यात आले.

**टिपू सुलतानचे मूल्यमापन :**

टिपू सुलतान हा एक साहसी व कुशल सेनापती होता. इंग्रजांचा कट्टर शत्रू असलेल्या टिपु सुलतानने त्यांचा अनेक लढायांमध्ये पराजय केला होता. टिपू सुलतानचे अंतर्गत शासन उत्कृष्ट होते. व्यापार, चलन व्यवस्था व  वजन - मापे यामधील त्याच्या सुधारणा महत्त्वपूर्ण होत्या. अपराध्यांच्या बाबतीत तो दया- माया ठेवीत नसे.

जॉन शोअरच्या लिखाणावरून टिपूच्या राज्यातील शेतकरी सुखी होता. तो धर्मवेडा होता असे म्हटले जाते. परंतु त्याचा पुर्णय्या सारख्या हिंदू अधिकाऱ्यावर विश्वास होता. राजा या नात्याने त्याने अनेक हिंदू मंदिरांना अनुदाने दिली. त्याने शक, सवत्सर, महिने वगैरेंना प्रचलित नावे बदलून त्यांना स्वतःची नावे दिली.

कर्क पॅट्रिक टिपू सुलतानला, 'निष्ठुर व अत्याचारी अन्यायी शासक म्हणून संबोधतात.'

इंग्रजांना भारतातून हाकलून देण्यासाठी टिपू सुलतानने भारतीय राजांची मदत न घेता परकीयांची मदत घेतली हीच त्याची फार मोठी चूक होती.

टिपूच्या मृत्युनंतर इंग्रजांनी म्हैसूरप्रांतावर 22 जून, 1799 रोजी श्रीरंगपट्टणमचा तह लादला. यातील कलमे पुढील प्रमाणे होती.

**श्रीरंगपट्टणमचा तह (22 जून,1799) :**

1. इंग्रजांना कानडा, कोयम्बंतूर, दारापुरम व श्रीरंगपट्टणम हे प्रदेश मिळाले.
2. निजामाला वेलस्लीने गुत्ती, गुर्रमकोंडा हा भाग सोडून बाकीचा चितळदुर्गाचा प्रदेश दिला.
3. पेशवे युद्धात तटस्थ राहिल्याने हरपनहळी व सुंडा हे दोन जिल्हे देऊ केले. परंतु पेशव्यांनी तैनाती फौज न स्वीकारल्यामुळे नकार दिला.

इंग्रजांनी वरील प्रदेश वगळता उर्वरित भागाचे म्हैसूरचे राज्य बनवले. येथे कृष्णराज ओडियर या पाच वर्षाच्या मुलाला गादीवर बसवले. पूर्णय्या याला त्याचा पालक संरक्षण करता व दिवाण म्हणून नेमले. म्हैसूरच्या संरक्षणासाठी तैनाती फौज तेथे नेमली. ज्याच्या खर्चासाठी सात लाख रुपये वार्षिक खंडणी कबूल करून घेतली. सर बेरी क्लोज याला म्हैसूर दरबारात वकील म्हणून ठेवले. डॉ. ईश्वरी प्रसाद म्हणतात, 'इंग्रजांचे विस्तारवादी धोरण लपवण्यासाठी वेलस्लीने म्हैसूरच्या गादीवर तेथील राजाचीच  प्रतिष्ठापना केली.'

| प्रश्न 1.  रिकाम्या जागा भरा. |
| --- |
| 1. प्लासीच्या लढाई वेळी ______________ बंगालचा नवाब हा होता . |

Dr. S. P. Kattimani History of Modern India

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | अ) सिराज उद्दौला | ब) अलीवर्दीखान | क) शुजाउद्दौला | ड) टिपू सुलतान | |
| 2. प्लासीची लढाई ______________रोजी झाली. | | | | | |
| | अ) 23 जुन 1857 | ब) 31 जुन 1957 | क) 23 जुन 1757 | ड) 18 जुन 1857 | |
| 3. पहिल्या इंग्रज-म्हैसूर लढाईचा शेवट______________ या तहाने झाला . | | | | | |
| | अ) मद्रास | ब) मुंगेर | क) श्रीरंगपट्टण | ड) अलीनगर | |
| 4. प्लासीच्या लढाईनंतर बंगालमध्ये दुहेरी राज्यव्यवस्था ______________याने निर्माण केली | | | | | |
| | अ) रॉबर्ट क्लाइव्ह | ब) लॉर्ड कर्जन | क) लॉर्ड कॅनिंग | ड) लॉर्ड वेलस्ली | |
| 5. मीर कासिम याने राजधानी मुर्शिदाबादहून ______________ येथे हलवली | | | | | |
| | अ) ओडीसा | ब) पाटना | क) लखनऊ | ड) मुंगेर | |
| 6. भारतीय इतिहासात ______________ प्रसिद्ध व्यक्ती म्हैसूर वाघ म्हणून ओळखला जातो? | | | | | |
| | अ) सरहद्द गांधी | ब) पंडित नेहरू | क) टिपू सुलतान | ड) सरदार पटेल | |
| 7. 1595 मध्ये हाऊटमॅन हा ______________ भारतात आला. | | | | | |
| | अ) डच | ब) फ्रेंच | क) ब्रिटीश | ड) पोर्तुगीज | |
| 8. 20 मार्च, 1602 रोजी ______________ ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली? | | | | | |
| | अ) डच | ब) फ्रेंच | क) ब्रिटीश | ड) पोर्तुगीज | |
| 9. बंगालच्या स्वतंत्र राज्याची स्थापना कोणी केली? | | | | | |
| | अ) अलीवर्दीखान | ब) मुर्शिद कुलीखान | क) गाजीउद्दिन | ड) सिराज उद्दोला | |
| 10. कालिकत येथील झामोरीन या राजाने कोणाचे स्वागत केले? | | | | | |
| | अ) अल्बुकर्क | ब) वास्को-द -गामा | क) हॉकिन्स | ड) निकोलस मनुची | |
| 11. 1608 मध्ये ब्रिटिशांचा कॅप्टन हॉकिंन्स______________ या व्यापारी जहाजातून सुरतला पोहोचला. | | | | | |
| | अ) टायटॅनिक | ब) मर्केटर | क) हेक्टर | ड) व्हिक्टोरिया | |
| 12. औरंगजेबच्या मृत्यूनंतर अर्काट राजधानी बनवून स्वतंत्र कर्नाटक राज्याची स्थापना कोणी केली? | | | | | |
| | अ) दोस्त अली | ब) सादतुल्ला खान | क) सफदर अली | ड) अन्वरुद्दीन | |
| 13. सिंध प्रांतातील प्रथम ब्रिटिश गव्हर्नर ______________ हा होय. | | | | | |
| | अ) रॉबर्ट मोंटगोमेरी | ब) हेनरी लॉरेन्स | क) चार्लस नेपियर | ड) जॉन शोअर | |
| 14. सिंध प्रांताचे विलीनीकरण ______________ गव्हर्नर जनरल च्या काळात झाले . | | | | | |
| | अ) लॉर्ड ऑकलंड | ब) लॉर्ड एलिनबरो | क) लॉर्ड डलहौसी | ड) विल्यम बेंटिंक | |
| 15. मुर्शिद कुलीखान याने राजधानी ढाक्यावरून ______________ येथे नेली. | | | | | |
| | अ) कासीमबझार | ब) मुंगेर | क) गौर | ड) मुर्शिदाबाद | |
| 17. ब्रिटिशांनी 1608 साली हिंदुस्थानातील पहिली वखार______________ येथे स्थापन केली. | | | | | |
| | अ) मुंबई | ब) सुरत | क) कलकत्ता | ड) मच्छलीपट्टण | |
| 18. बक्सारच्या युद्धाच्या वेळी ______________ हा ब्रिटिशांचा सेनानी होता. | | | | | |
| | अ) ऑर्थर वेलस्ली | ब) सर हॉर्नबी | क) हेक्टर मन्रो | ड) सर आयरकुट | |
| 19. दुसरे इंग्रज-म्हैसूर युद्ध ______________ या गव्हर्नर जनरलच्या कारकिर्दीत झाले. | | | | | |
| | अ) लॉर्ड कॉर्नवॉलीस | ब) लॉर्ड हेस्टिंग्ज | क) वॉरन हेस्टींग्ज | ड) लॉर्ड वेलस्ली | |
| 21. पहिल्या इंग्रज म्हैसूर युद्धाच्या वेळी______________ या इंग्रज सेनापतीचा हैदरने पराभव केला. | | | | | |
| | अ) कर्नल स्मिथ | ब) सर आयरकुट | क) सर हॉर्नबी | ड) मेजर मन्रो | |
| 22. बक्सारच्या युद्धानंतर बंगालमधील परिस्थिती सावरण्यासाठी______________ यास पुन्हा हिंदुस्तानात पाठवण्यात आले. | | | | | |
| | अ) वारेन हेस्टिंग्ज | ब) लॉर्ड कॉर्नवॉलीस | क) रॉबर्ट क्लाइव्ह | ड) जॉन शोअर | |
| 23. फोर्ट विल्यम येथील अंधार कोठडीच्या दुर्घटनेच्या माहितीचे विवरण आपल्याला______________या इंग्रजांकडून प्राप्त होते. | | | | | |
| | अ) जॉन सुरमैन | ब) स्टीफन्सन | क) हॉलवेल | ड) विल्यम हॅमिल्टन | |
| 24. प्लासीच्या युध्दानंतर______________हा बंगालचा नवाब झाला. | | | | | |
| | अ) मीर कासीम | ब) मीरजाफर | क) शुजाउद्दौला | ड) नज्मउद्दौला | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|

**योग्य उत्तरे :**

**1 - अ , 2 - क, 3 - अ, 4 – अ, 5 – ड, 6 – क, 7 – अ, 8 – अ, 9 – ब, 10 – ब, 11 – क, 12 – ब, 13 – क, 14 – ब,**

**15 – ड, 16 – ड, 17 – ब, 18 – क, 19 – क, 20 – क, 21 – ब, 22 – क, 23 – क, 24 - ब**

**प्रश्न 2. योग्य जोड्या जुळवा.**

| अ.क्र. | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| 1. | फोर्ट विल्यम | i. अवधचा नवाब |
| 2. | शुजाउद्दौला | ii.अंधार कोठडीची घटना |
| 3. | वॉरन हेस्टींग | iii.तैनाती फौज |
| 4. | लॉर्ड वेलस्ली | iv.बक्सारची लढाई |
| 5. | फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी स्थापना | v.गुंटूरचा प्रदेश |
| 6. | निजाम | vi. 31 डिसेंबर,1600 |
| 7. | ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी स्थापना | vii. 1st सप्टेंबर, 1964 |
| 8. | डच ईस्ट इंडिया कंपनी स्थापना | viii. 1453 |
| 9. | कॉन्स्टँटिनोपल शहर तुर्कांनी जिंकून घेतले | ix.20 मार्च, 1602 |

**योग्य उत्तरे** (1= ii, 2= i, 3 =iv, 4=iii,5=vii,6=v,7=vi ,8=ix, 9= viii)

**प्रश्न 2 . खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)**

1. बंगालमध्ये ब्रिटिश सत्तेचा उदय कसा झाला ते स्पष्ट करा.
2. अठराव्या शतकाच्या मध्यातील इंग्रज- फ्रेंच संघर्षाची माहिती द्या.
3. प्लासीच्या लढाईची कारणे व परिणाम सांगा.
4. बक्सारच्या लढाईची कारणे, स्वरूप व महत्त्व स्पष्ट करा.
5. पोर्तुगीजांच्या भारतातील राज्यविस्ताराची माहिती सांगा.
6. इ. स.1767 ते 1799 या काळातील इंग्रज-म्हैसूर संबंधांचा आढावा घ्या.

**प्रश्न 3. टिपा लिहा**

1 सिराज उद्दौला
2 अलीनगरचा तह
3 कलकत्त्याची अंधार कोठडीची दुर्घटना
4 मीर कासीम
5 बक्सारच्या लढाईचे परिणाम
6 इंग्रज म्हैसूर पहिले युद्ध
7 टिपू सुलतान
8 इंग्रज म्हैसूर तिसरे युद्ध

Dr. S. P. Katmani History of Modern India

9 डच ईस्ट इंडिया कंपनी

Dr. S. R. Kattimani History of Modern India